महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २९७ दिनांक ०७ / ०७ / २०१०

विषय : कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचाराकरिता अग्रीम रक्कम मंजुर करण्याच्या अधिकारांबाबत.

संदर्भ : १) सा.आ. क्र.२० (क) दि. १७.०६.१९६३.
२) स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.०२.१९९८
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६
४) प्रशासकीय परिपत्रक क्र.२७२ दि.३०.१२.२००९

.....

कामावर असताना कंपनीच्या कर्मचाऱ्यास अपघात झाल्यास त्यावर तात्काळ वैद्यकीय उपचार सुरू करता यावेत म्हणून स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.०२.१९९८ अन्वये तात्पुरती अग्रीम रक्कम मंजुर करण्याचे अधिकार क्षेत्रिय कार्यालयातील अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. तसेच सदर उपचारापोटी झालेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती मंजुर करण्याबाबतचे अधिकार प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६ व प्रशासकीय परिपत्रक क्र.२७२ दि.३०.१२.२००९ अन्वये सुधारित करण्यात आलेले आहेत.

२. अपघातग्रस्त कर्मचाऱ्यास तातडीचे उपचाराकरिता नजिकच्या रूग्णालयात दाखल केल्यानंतर तीन दिवसांच्या आत कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयात दाखल करणे बरेचदा रुग्ण अत्यावस्थ अवस्थेत असल्यामुळे शक्य होत नाही. त्याचप्रमाणे वैद्यकीय उपचाराकरिता अग्रीम रकमेच्या मंजुरीकरिता प्रशासकीय विलंब होत असल्यामुळे तीन दिवसांच्या कालावधीत वाढ करणेबाबत त्याचप्रमाणे अग्रीम रकमेच्या मंजुरीकरिता प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

३. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी कार्यकारी संचालक (मासं), संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून कामावर असताना अपघात झालेल्या कर्मचाऱ्यांना अग्रीम रक्कम मंजूर करण्याकरिता पुर्वी प्रदान करण्यात आलेले अधिकार आता खालील प्रमाणे सुधारित करण्यास मंजुरी दिलेली आहे.

| अ. क्र. | क्षेत्रिय/सांघिक कार्यालयातील सक्षम अधिकारी | पुर्वीची तरतूद (अग्रीम राशीची रक्कम) | सुधारित तरतूद (अग्रीम राशीची रक्कम) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | कार्यकारी अभियंता | रु.१०,०००/- | रु.१०,०००/- |
| २ | अधीक्षक अभियंता | रु.१५,०००/- | रु.१५,०००/- |
| ३ | मुख्य अभियंता | रु.२०,०००/- | रु.५०,०००/- |
| ४ | संबंधीत क्षेत्रिय कार्यकारी संचालक | काही नाही | रु.५०,००१/- ते १,००,०००/- पर्यंत |
| ४ | संचालक (वित्त) | रु.७,००,०००/- पर्यंत | रु.१,००,००१/- ते ७,००,०००/- पर्यंत |
| ५ | व्यवस्थापकीय संचालक | रु.७,००,०००/- च्या पेक्षा अधिक रकमेसाठी | रु.७,००,०००/- च्या पेक्षा अधिक रकमेसाठी |

४. कामावर असताना अपघात झाल्यास उपचारासाठी झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या रकमेची प्रतिपुर्ती मंजुर करण्यासाठी प्रशासकीय परिपत्रक क्र.२७२ दिनांक ३०.१२.२००९ मधील परिच्छेद क्र.३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

५. अपघात झालेल्या कर्मचाऱ्यास कंपनीच्या मान्यताप्राप्त रूग्णालयाव्यतिरिक्त इतर रूग्णालयामध्ये उपचार करण्यासाठी तातडीने दाखल केले असल्यास अशा कर्मचाऱ्यास दहा दिवसाच्या कालावधीत कंपनीने मान्यता दिलेल्या रूग्णालयात दाखल करण्यात यावे. तसेच रूग्णालयात दाखल करताना प्रशासकीय परिपत्रक क्र.३१ दि.२९.०३.२००६ नुसार राहण्याच्या खोलीबाबत केलेल्या वर्गीकरणाबाबतच्या तरतुदींचे पालन करावे.

६. स.स्था.आ.क्र.३७७ दि.३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२ दि.१२.०२.१९९८, प्रशासकीय परिपत्रक क्र.४९ दि.१९.०५.२००६ व प्रशासकीय परिपत्रक क्र.२७२ दिनांक ३०.१२.२००९ मध्ये तद्नुषंगिक बदल करण्यात येत आहेत.

७. अशा प्रकारची प्रलंबित प्रकरणे सदर प्रशासकीय परिपत्रकातील तरतुदीनुसार निकाली काढण्यात यावीत. पुर्वी निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता नाही.

८. सदर परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

( सु. य. पाटील )
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे